# भारतातील ग्रामीण विकासातील समस्या

**प्रा. डॉ. आर. बी. शेटे**
राज्यषास्त्र विभाग प्रमुख
शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर,जि.नांदेड – ४३१७०४

★★★

**प्रस्तावना** – भारत हा खेड्यांचा देश आहे. आजही भारतात एकूण लोकसंख्येच्या दोन तृतीयांश लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. स्वातंर्त्यानंतर भारताचा जो विकास होत राहिला यात औद्योगीकरण आणि शहरीकरण यावर जास्त भर राहिला आहे. या तुलनेत ग्रामीण भागातील विकास झालेला दिसून येत नाही. म्हणूनच भारताची विभागणी दोन भागात केली जाते, एक इंडिया आणि दुसरा भारत, इंडिया हा शहरी भागाचा किंवा शहरी भारताचं प्रतिनिधित्व करणारा तर भारत हा ग्रामीण भागाचा प्रतिनिधित्व करणारा म्हणून ओळखला जातो. ग्रामीण भारताच्या विकासा पुढील अनेक समस्या आहेत. लोकसंख्या, भ्रष्टाचार, बेरोजगारी, भाषावाद,जातिवाद, दारिर्द्य, कर्जबाजारीपणा, विकासातील विशमता, व्यसनाधीनता, मानवी संसाधनाचा निकृष्ट दर्जा, यासारख्य समस्या दिसून येतात. देशाच्या सर्वांगीण विकासात सर्वात मोठी समस्या ग्रामीण भागाचा असमतोल विकास होय. ग्रामीण विकासाशिवाय भारताचा विकास होणार नाही असे आपणास म्हणता येईल. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी ग्रामीण विकास होणे आवश्यक आहे. म्हणून आपणास ग्रामीण विकासाचा व त्या पुढील समस्यांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. प्रस्तुत शोधनिबंधात ग्रामीण विकासाच्या समस्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रस्तुत शोधनिबंधा साठी पुढीलप्रमाणे उद्दिष्टे निश्चित करण्यात आली.

1.ग्रामीण विकासातील समस्यांचा शोध घेणे.
2.ग्रामीण विकासाची संकल्पना समजून घेणे.

**गृहीतक**– 1. ग्रामीण विकासात समस्या दिसून येतात. प्रस्तुत शोधनिबंधासाठी गृहीतक निश्चित करून.संशोधन पद्धती प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी वर्णनात्मक, विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.संदर्भ साहित्याचा आधार घेऊन प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यात आला आहे. तथ्य संकलनसाठी दुय्यम साधनाचा वापर करण्यात आला आहे.

**ग्रामीण विकासाची संकल्पना** – ग्रामीण विकास ही एक लवचिक संकल्पना आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांसाठी ग्रामीण विकास कार्यक्रमांना प्राधान्य देणे म्हणजे ग्रामीण विकास होय. या मध्ये कृशी विकास, ग्रामीण आरोग्य, शिक्षण, दळणवळण या साधनात सुधारणा, ग्रामीण गृहनिर्माण, राहणीमानाचा दर्जा उंचावणे, विविध ग्रामीण विकासाच्या योजनांची अंमलबजावणी करणे व ग्रामीण लोकांच्या सामाजिक आर्थिक राजकीय व प्रशासकीय स्थितीत सुधारणा घडवून आणणे म्हणजे ग्रामीण विकास होय.1

ग्रामीण विकास हा शब्द ग्रामीण आणि विकास या दोन शब्दांपासून बनलेला आहे. त्याचा आशय गावाच्या समग्र विकासाशी संबंधित आहे. असा 'एक समुदाय जो निश्चित संख्येने ग्रामीण क्षेत्रात राहतो, त्यास गाव असे म्हणतात. त्या गावचा सर्वांगीण विकास म्हणजे ग्रामीण विकास होय. ग्रामीण विकासाच्या निरनीराळ्या व्याख्या केलेले आहेत. यामध्ये काही व्याख्या आपणास पुढील प्रमाणे सांगता येतील .

1. जागतिक बँकेच्या विकासनीती 1975 नुसार, 'ग्रामीण विकास एक अशी रणनीती आहे की जी ग्रामीण भागातील गरीब, निर्धन, अल्पभूधारक,सीमांत शेतकरी,भूमिहीन, शेतमजूर यांच्या सामाजिक आर्थिक जीवनात सुधारणा घडवून आणतो'.

2. उमा लैली यांनी केलेली व्याख्या रू 'ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण क्षेत्रात राहणाऱ्या अनेकानेक कमी उत्पन्न गटातील लोकांच्या जीवनस्तरात किंवा राहणीमानात सुधारणा घडवून आणणे तसेच त्यांच्या विकासक्रमाला आत्मनिर्भर बनवणे होय'. वरील व्याख्यान वरून ग्रामीण विकासाच्या संकल्पनेविषयी काही निश्कर्ष आपणास सांगता येतील. ग्रामीण विकास म्हणजे 'ज्यांचा व्यवसाय, सामाजिक संघटन आणि राहणीमानाची शैली व गैरशहरी आहे व मुख्य व्यवसाय शेती व शेतीवर आधारित आहे'. सामाजिक, आर्थिक, राजकीय व भौतिक विकासाच्या उद्देशाने नियोजित पद्धतीने परिवर्तन घडवून आणणे, ही ग्रामीण विकास प्रशासनाची रणनीती आहे. अशाप्रकारे आपणास ग्रामीण विकासाचा अर्थ लक्षात घेता येतो.

**ग्रामीण विकासाच्या समस्या** – विकास हा शब्द प्रगती किंवा उन्नती सुचित करणार आहे. ग्रामीण विकासाच्या बाबत असे म्हणता येईल की, ग्रामीण भागातील लोकांचा भौतिक,सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि प्रशासकीय स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणणे म्हणजे विकास. वरील क्षेत्रात सुधारणा घडवून आणून ग्रामीण भागाला विकसित किंवा प्रगत भागाबरोबर नेणे महत्त्वाचे ठरते. तेव्हाच देशाचा सर्वांगीण विकास होऊ शकेल. परंतु ग्रामीण विकासाच्या मार्गात अनेक समस्या किंवा अडथळे निर्माण झाले आहे. त्यामुळे ग्रामीण विकास झालेला दिसून येत नाही. ग्रामीण विकासाच्या समस्या जाणून घेतल्यास आपणास ग्रामीण विकास घडवून आणता येईल. ग्रामीण विकासाची एकूणच प्रक्रिया ही अतिशय गुंतागुंतीचे असून तिच्या संबंधीत घटकांची संलग्नता न विसरता एकात्म दृष्टीकोनातुन विचार करून ग्रामीण विकासातील ज्या समस्या आहेत त्या पुढील प्रमाणे आपणास अभ्यासता येतील.

**1. दारिद्य**– 'भारतातील दारिर्द्य''Poverty in India" प्रा. वि. म. दांडेकर व प्रा. नीळकंठ यांनी लिहिलेल्या या पुस्तकात दारिर्द्याचे दरडोई खर्चाच्या आधारावर निकष ठरवून दिले आहे. त्यानुसार भारतातील 40 टक्के लोक दरिद्री आहेत. दारिर्द्यरेषेच्या आसपास हे लोक जीवन

जगताना दिसून येतात.त्यांना मानवी मूलभूत गरजा सुद्धा मिळत नाहीत. उदाहरनार्थ अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, रोजगार या गरजांची पूर्तता ग्रामीण भागातून दिसून येत नाही. ही देशाच्या विकासासाठी अतिशय गंभीर बाब आहे असे म्हणता येईल.

**2. बेकारी** – दारिद्र्याचे मुख्य कारण बेकारी हे ठरते. ग्रामीण भागात बेकारी निर्माण होण्याची कारणे अनेक दिसतात. यामध्ये शेतीचे मागासलेपण,भारतातील शेती ही इतर प्रगत राष्ट्रांच्या तुलनेत अप्रगत समजली जाते. विशेषतः निसर्गावर मोठ्या प्रमाणामध्ये भारतीय शेती अवलंबून आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव येथील शेती मध्ये दिसून येतो. शेतीमाल बाजारपेठांची समस्या, हंगामी स्वरुपाची शेती, भांडवल व पाण्याची कमतरता. अशा कारणांमुळे शेतीचा विकास झालेला नाही. याबरोबरच बेकारी चे व दारिद्र्याचे एक मुख्य कारण लोकसंख्या वाढ हे सांगता येईल. संत तुकाराम महाराज वाढत्या लोकसंख्ये बाबत आपल्या अभंगामध्ये मध्ये सांगतात 'लेकुरे उदंड जाहली, बापुडे भीकेस लागली.म्हणजेच संत तुकाराम महाराजांनी वाढत्या लोकसंख्येवर आळा घालण्यासाठी निर्देश देऊन दारिद्र्याचे व बेकारीचे मुख्य कारण वाढती लोकसंख्या हे निदर्शनास आणून दिले आहे. ग्रामीण भागात दैववाद, परंपरावादी वश्ती, अज्ञान, अंधश्रद्धा, निरक्षरता, यामुळेसुद्धा लोकसंख्या वाढ झपाट्याने होत राहीली, वाढत्या लोकसंख्येला हाताला काम मिळणे महत्त्वाचे असते परंतु ग्रामीण भागामध्ये शेतीशिवाय इतर दुसरा उद्योग नाही. त्यामुळे अनेक लोक बेकार झालेले दिसतात.

**3. व्यसनाधीनता**– ग्रामीण भागामध्ये आज मोठ्या प्रमाणामध्ये व्यसनाधीनता आढळून येत आहे. वाईट बाबीचे अनुकरण करून दारू, बीडी,सिगारेट,जुगार यासारख्या व्यसनामध्ये वाढ होताना दिसून येते. अज्ञान हे व्यसनाधीनचे मुख्य कारण मानले जाते. व्यसनीप्रवर्ती वाढल्यामुळे ग्रामीण भागातील लोकांच्या खर्चात वाढ होताना दिसते, यातून बेफिकीर वस्ती निर्माण होऊन अधिकच व्यसनाधिनता वाढायला लागते. याचा परिणाम विकासावर होताना दिसतो. ग्रामीण भागाचा विकास न होण्याचे कारण किंवा एक समस्या व्यसनाधिनता हे सांगता येईल

**4. कर्जबाजारीपणा** – ग्रामीण विकासाला सर्वात महत्वाचा अडथळा ठरणारा घटक म्हणजे कर्जबाजारीपणा होय. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणामध्ये कर्ज काढून सण–उत्सव, लग्न समारंभ, तेरवी, यासारखे कार्यक्रम साजरे करताना दिसून येतात. यातून लोक कर्जबाजारी होऊन या समस्येमध्ये अडकतात. शेती हेच एकमेव उत्पादनाचे साधन असल्यामुळे तिच्या उत्पादनाची निश्चितता असत नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये कर्ज फेडण्यास विलंब लागतो. सततच्या कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांच्या मध्ये होणाऱ्या आत्महत्यांचे प्रमाण वाढलेले आपणास दिसते. याचे कारण कर्जबाजारीपणा सांगता येईल.

5. मानवी संसाधनाचा निकृष्ट दजा – कोणत्याही भागाचा विकास हा त्या क्षेत्रात राहणाऱ्या मानवी संसाधनांचा योग्य वापर यावर अवलंबून असतो. मानवी गुणवत्ता शिक्षण आणि आरोग्य आणि कौशल्य या आधारावर मोजली जाते. भारतीय ग्रामीण विकासात मानवी गुणवत्ता किंवा साधन संपत्तीचा दर्जा निकृष्ट मानला जातो. मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागात असणारे कुपोषण,जीवनसत्त्वांचा अभाव, आरोग्य निरक्षरता, अज्ञान, अंधश्रद्धा, जुनाट रुढी, परंपरा, लिंगभेद विषमता, प्रतिगामी वस्ती, याबरोबरच पुरेसे व्यवसायिक किंवा कौशल्य शिक्षणाचा अभाव यामुळे विकास प्रक्रिया हे काही अंषी संथ व अडचणी बनलेली दिसून येते.

**6 विकासातील विषमता** – विकास हा समतोल व सर्वांगीण होणे आवश्यक असते. भारताला स्वातंर्त्र्य मिळाल्यावर मोठ्या प्रमाणामध्ये तत्कालीन गरज म्हणून औद्योगिक करण्यास प्राधान्य देऊन शहरी भागात विकास साधण्यात येऊ लागला. परंतु ग्रामीण भागाकडे म्हणावे तसे लक्ष देण्यास शासन अपुरे पडले. यातून शहरी व ग्रामीण असा फरक मोठ्या प्रमाणात पडला. मागास प्रभाग अधिकच मागास राहिलेले आपणास दिसतो. याउलट प्रगत भाग अधिक प्रगत आणि प्रगत लोक अधिक प्रगती करताना दिसून येतात. उदाहरणार्थ महाराष्ट्रातील विभागवार पाहिले तर पश्चिम महाराष्ट्राचा झालेला औद्योगिक व शेती, सहकार यांचा घडून आलेला विकास या तुलनेत मराठवाडा व विदर्भामध्ये म्हणावा तेवढा विकास झालेला दिसत नाही. हीच खरी विकासातील विषमता आहे. हाच विषमता वाद आहे. असेच आपणास दिसून येते.

**सारांश** – ग्रामीण विकासाचा संबंध ग्रामीण क्षेत्राच्या विकासासाठी विकासाशी आहे. ग्रामीण विकासात सांस्कृतिक विकास, शिक्षण,आरोग्य, सामाजिक गरजा व सुविधांचा विकास घडवून आणण्याच्या प्रक्रियेचा समावेश होतो. भारताच्या विकासात ग्रामीण विकासाची भूमिका राहिली आहे. शेतीविकास, ग्रामीण औद्योगिक विकास, ग्रामीण सामाजिक समस्या दूर करुन नागरी व ग्रामीण भागातील विषमता दूर करणे,ग्रामीण विकासात दारिद्रय दुरुकरून,रोजगाराची निर्मिती करणे मानव संसाधनाचा विकास घडवून आणण्यासाठी त्यादृष्टीने स्वयंरोजगार निर्माण करून, विभागीय असमतोल दूर करणे, यासाठी ग्रामीण विकासाच्या समस्या दूर करुन ग्रामीण विकास साध्य केला जाऊ शकेल असे म्हणता येत.

### *संदर्भसूची*


1. *डॉ.आवस्थी ए.पी. दृ विकास प्रशासन दृलक्ष्मी नारायण अग्रवाल,आग्रा २००७.पृष्ठ –१२८*
2. *World bank : Rural Development sector Policy paper ]May 1975 च.दव.03*
3. *डॉ.पंत डी.सी. भारत मे ग्रामीण विकास ,कॉलेज बुक डेपो,जयपूर,2009–पृष्ठ 12.*
4. *भारतातील ग्रामीण विकास संपादक डॉ. अर्चना कांबळे (जगतकर), समाजशास्त्र विभागप्रमुख,न्यु कॉलेज,कोल्हापूर. प्रकाशक कुलसचिव , शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–२०१७.*
5. *संशोधक प्रा.सुरेश शंकर मुळूक ,जिल्हा परिषदे मार्फत राबवण्यात येणाऱ्या ग्रामीण विकास योजनांचे मूल्यमापन (२००२–२०१२) विशेष संदर्भ पुणे व सातारा जिल्हा. अप्रकाशित शोध प्रबंध,टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ,पुणे.*